महाराष्ट्र शासन
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
प्रशासकीय इमारत कृषि नगर, परभणी ४३१ ४०२
कुलसचिव कार्यालय
ईमेल : reg_mau@rediffmail.com
संकेतस्थळ : www.vnmkv.ac.in
फॅक्सः (०२४५२) २२९७५५,२२३५८२
दुरध्वनीः (०२४५२) २२९७५५

जा.क्र.२०२६/जपुती/ साप्रवि-४/258 दिनांक २०.०१.२०२६ 21

**संदर्भ -** मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी यांचे पत्र जा.क्र.२०२६/निवडणूक/कावी-१४ दिनांक १६.०१.२०२६

**दि.२३ जानेवारी २०२६ रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याबाबत.**

## परिपत्रक

संदर्भीय पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी यांनी कळविले आहे की, दि.२५ जानेवारी २०२६ रोजीच्या १६ व्या राष्ट्रीय मतदार दिन राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्रस्तरावर साजरा करावयाचा आहे. सदर १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनासाठी My India My Vote हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे. नागरिकांमध्ये जनजागृत्ती होण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन मोठयाप्रमाणात साजरा करण्याच्या भारत निवडणूक आयोगाच्या सुचना आहेत.

तथापि, दिनांक २५ जानेवारी, २०२६ रोजी रविवार हा सुट्टीचा दिवस असल्याने राज्यातील सर्व शासकीय विभाग / सार्वजनिक उपक्रम यामधील अधिकारी / कर्मचारी यांनी मतदान दिनाची शपथ घेण्याचा कार्यक्रम कार्यालयीन दिनी म्हणजेच दिनांक २३.०१.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वा सोईस्कर होईल अशा वेळी आयोजीत करण्याच्या सुचना भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाल्या आहेत.

करीता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यासाठी मतदारांनी घ्यावयाची शपथ / प्रतिज्ञेची प्रत यासोबत पाठविण्यात येत असून **दि.२३.०१.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** वा सोईस्कर होईल अशा वेळी आपले कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे उपस्थित आयोजीत करण्यात यावा, तसेच साजरा करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सोबत** : शपथ / प्रतिज्ञेची प्रत.

**(संतोष वेणीकर)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपी :**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण/ सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, आपल्या

अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांचे निदर्शनास सदरील परिपत्रक आणून दयावे व त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचित करावे.

२. विद्यापीठ अभियंता, वनामकृवि परभणी यांना देवून सूचित करण्यात येते की, प्रशासकीय इमारती मधील कर्मचारी यांचे करीता उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन हॉल क्र.१८ (Symposium Hall) मध्ये करावे व त्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करावी ही विनंती.

**प्रत :**

१. नियंत्रक, वनामकृवि, परभणी

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

३. उपकुलसचिव (आस्था/ विद्या/ साप्रवि), वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रकाची प्रत सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देवून सर्व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

४. मा.कुलगुरू महोदय, यांचे खाजगी सचिव वनामकृवि, परभणी

५. मा.कुलसचिव, यांचे स्विय सहाय्यक वनामकृवि, परभणी

६. श्री.एम.डी.शेळके, पहारेकरी, यांना विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी यांचे मार्फत.

40

परिशिष्ट २

राष्ट्रीय मतदार दिवस

मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."

*****************